# निविदा-सुचना

## वाहन सेवा (जानेवारी २०२६-डिसेंबर२०२७)

# राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था

जुना पुणे-मुंबई हायवे,
सर्व्हे नं.३९८/४००,सी.आर.पी.एफ कॅम्पसजवळ
तळेगाव-दाभाडे,तालुका मावळ,जिल्हा,पुणे -४१०५०६
टेलीफोननं. : - ०२११४-२५५४८०

ई-मेल- htc_td@yahoo.co.in, संकेतस्थळwww.nipht.org

# राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था

## निविदा सूचना-जानेवारी २०२६- डिसेंबर२०२७

दुरध्वनी क्रमांक:-०२११४-२५५४८०

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थे करिता सन जानेवारी २०२६-डिसेंबर२०२७ या दोन वर्ष कालावधीसाठी आवश्यकतेनुसार भाडयाने वाहन पुरविणे करिता निविदा पध्दतीने मा. संचालक,रा.सु.प.तं.सं यांच्या वतीने तत्सम कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून दर करार करण्याकरिता दिनांक ३१.१२.२०२५ ते दिनांक १२.०१.२०२६ या कालावधीमध्ये निविदा पध्दतीने दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

सदरील कामाची अंदाजित किंमत प्रति वर्ष रुपये ५,००,०००/- (पाच लाख रूपये फक्त) इतकी आहे. वरील कामांची निविदा सूचना www.nipht.orgया संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा भरण्याची अंतिम तारीख १२.०१.२०२६ रोजी सांय.५.०० वाजेपर्यत आहे. निविदा फॉर्म स्विकृतीची कार्यवाही वरील कालावधीत( शनिवार,रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) रा.सु.प.तं.संस्था, तळेगाव दाभाडे येथे करण्यात येईल, याची सर्व निविदा धारकांनी नोंद घ्यावी. निविदा बाबत काही शंका असल्यास वरील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. इतरअटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील.सदर कामांची एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचेअधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**संचालक,**
**रा.सु.प.तं.सं**

# <u>निविदा सूचना</u>

वाहन व्यवस्था – जानेवारी 2026-डिसेंबर2027

| | |
|---|---|
| अंदाजे उलाढाल रक्कम | रूपये ५.०० लाख (एक वर्ष,) |
| सुरक्षाठेव | रुपये - २५,०००/- |
| निविदा फॉर्मची उपलब्धी | दि.३१.१२.२०२५ ते दि.१२.०१.२०२६ |
| निविदा फॉर्म स्विकृतीची अंतिम तारीख,वेळ | दिनांक १२.०१.२०२६ सांय.५.०० वा. |
| ठिकाण | रा.सु.प.तं.संस्था,तळेगाव दाभाडे,पुणे |

## राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था

०१ रा.सु.प.तं.संस्थेमध्ये जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२७ या कालावधीकरिता दर कराराने वाहन व्यवस्था पुरवण्या करिता निविदा पध्दतीने मा.संचालक,रा.सु.प.तं.संस्था यांच्या वतीने तत्सम कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून निविदा मागवण्यात येत आहे.

०२ राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थाही शेतकरी, विद्यार्थी, व महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणारी भारतातील एक अग्रगण्य स्वायत्त संस्था आहे.

०३. रा.सु.प.तं.संस्थेमध्ये वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. सदर प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये क्षेत्र भेटी, अभ्यास सहली ही आयोजित केल्या जातात. येथे येणारे प्रशिक्षणार्थीसाठी वेळोवेळी सुसज्ज व सुस्थितीत असलेल्या वाहनांची आवश्यकता भासते, तसेच कार्यालयीन कामकाजासाठी देखील वाहनांची आवश्यकता लागते

०४. कार (सेलेरिओ /स्विफ्ट डिझायर /i-१०,i२०)इनोव्हा / ईरिटीका इ. या गाडयांचे साधे आणि एसी,तसेच बसचे (२X२) १७ आसनी, २०आसनी, ३२ आसनी, ३६आसनी व ४०आसनी,४६आसनी ए.सी व साधे वाहनांचे दरपत्रक सोबतच्या विहीत नमूना मध्ये भरावेत.

## **निविदाबाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे**

०१. निविदा दोन लिफाफे पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे.

०२. विहीत वेळेत प्राप्त निविदा उपस्थित निविदाधारकांसमोर अगर रा.सु.प.तं.संस्थेमधील प्राधिकृत अधिकारी यांचे समोर उघडण्यात येतील.

०३. सर्व प्रथम लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल व निविदेत नमूद केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर केले आहेत याबाबत खात्री करून घेतल्यानंतरच निविदा दराबाबतचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

०४. आवश्यक कागदपत्रे/ प्रमाणपत्रे व निविदा दर सादर केल्याचे आढळून न आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

### **लिफाफा क्रमांक १**

१. किमान दोन वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र- सन २०१५ पुढील दोन वर्षाचा (**आवश्यक अट**)

**२** एजन्सी / कंपनीची माहिती (**आवश्यक अट**)

मालकाचे नांव

कार्यालयाचा संपूर्ण पत्ता,  दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमाक, फॅक्स नंबर, ई-मेल पत्ता.

३ जी.एस.टी .प्रमाणपत्राची छायांकित प्रत. (**आवश्यक अट**)

४. पॅन कार्ड नंबर व प्रमाणपत्राची छायांकित प्रत व आधारकार्ड छायांकित प्रत (**आवश्यक अट**)

**५.** मागीलआर्थिक वर्षाचेआयकर विवरण पत्र सादरकरावे (**आवश्यक अट**)

६. स्वत:च्या मालकीच्या किमान वेगवेगळया प्रकारच्या ०२कार व ०१ बस असल्या

पाहिजेत. वाहननोंदणी प्रमाणपत्रांच्या प्रती जोडाव्यात.(**टॅक्स पावतीसह**) ०१ बस स्वत:ची नसल्यास इतर संस्थेकडून बस पुरविण्याबाबतचे हमी पत्र (**आवश्यक अट**)

७. आपण सेवा पुरवठा करत असलेल्या ग्राहकांची यादी व त्या कार्यालयाचे पत्ते, व दूरध्वनी क्रमांक.(**आवश्यक अट**)

८. वर अ. क्र. ०६ येथे नमूद केलेल्या स्वत:च्या मालकीच्या वाहनांखेरीज दुस-या संस्थेची वाहने पुरविणार असाल तर संबंधित संस्थेचे संमतीपत्र असले पाहिजे.(**आवश्यक अट**)

**वरील अ. क्र. ०१ ते ०८ येथील सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे आवश्यक असून त्यांची पूर्तता न झाल्यास लिफाफा क्र.२ उघडला जाणार नाही.**

## लिफाफा क्रमांक २

**लिफाफा क्रमांक २ मध्ये** फक्त परिशिष्ट - 'अ'विहीत नमुन्यामध्ये निविदेच्या दराबाबत माहिती सादर करावी. सदरील माहिती लेटरहेडवर दिनांक,सही शिक्यानिशी सादर करावी.(**निविदेच्या परिशिष्ट अ मधील सर्व वाहनांच्या दराचे सर्व रकाने भरणे अनिवार्य आहे, परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेले वाहन व्यतिरिक्त इतर वाहन पुरवठा मागणीनुसार केल्यास त्याचे कोटेशन त्या त्या वेळी सादर करुन मंजुरीअंती जो दर अंतिम होईल त्या दराने वाहन पुरवठा बील अदा करणेत येईल.**)

**अ**)लिफाफा क्र.१ उघडल्यानंतर आवश्यक दस्तऐवजांची पूर्तता केली असल्याची खात्री केल्यानंतरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

**ब**)लिफाफा क्र. २ उघडण्याच्या तारखेपासून निविदा स्विकृत करण्याचा कालावधी सहा महिने राहील.

## अटी व शर्ती

१. सोबत जोडण्यात आलेले वाहनांचे दरपत्रक रा. सु. प. तं. संस्थेमधील सर्व विभागांसाठी व कार्यालयांसाठी लागू राहील.

२. मान्य झालेल्या दरानुसार व संस्थेतील मागणीनुसार वाहनांचा पुरवठा दोन वर्ष करणे आपणावर बंधनकारक असेल. कराराचा कालावधी कामकाज आदेश दिलेपासून दोन वर्षाचा( २४ महिने) राहील.

३. सदर कामाचा ठेका मंजूर झाल्यास त्याबाबतच्या कराराचा मसुदा रा.सु.प.तं.संस्थेकडुन घेऊन तो शासन नियमानुसार आवश्यक रुपये ५००/-रकमेच्या शासकीय मुद्रांक पेपरवर तयार करून द्यावा लागेल. मुद्रांक पेपरचा खर्च ठेकेदारास करावा लागेल.

४. अंदाजित उलाढालीच्या ५% म्हणजे रुपये २५,०००/- एवढी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून (बिन व्याजी) ठेकेदाराने रा.सु.प.तं. संस्थेकडे भरणा करणे आवश्यक आहे.

५. आपणास कार्यालयाकडून वाहनाची वर्दी ( बसेस साठी किमान ०१ दिवस आधी व इतर वाहनांसाठी किमान ०२ तास अगोदर ) देण्यात येईल.

६. वाहनासाठी वर्दी मिळाल्यानंतर वाहन विहीत वेळेत विहीत पत्त्यावर पोहोचणे आवश्यक आहे.

७. आपणाकडून पुरविण्यात येणारे वाहन मागणी केलेल्या प्रकाराचे व सुस्थितीत असणे आवश्यक आहे. तसेच त्याची देखभाल योग्य प्रकारे केलेली असावी. पुरविलेले वाहन एक लाख कि मी पेक्षा कमी धाव झालेले असले पाहिजे.

८. आपणाकडून पुरविण्यात आलेल्या वाहनात दोष आढळून आल्यास किंवा वाहन विहीत कालावधीत उपलब्ध न झाल्यास, वाहन चालकाचे गैरवर्तन आढळून आल्यास त्या वर्दीच्या

देयकातून ३०% रक्कम दंड म्हणून कपात करण्यात येईल. याबाबत रा.सु.प.तं. संस्थेकडुन कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

९. प्रवास करते वेळी लागणाऱ्या वाहनांच्या व चालकांच्या सर्व कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता केलेली असावी. प्रवासादरम्यान काही कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास ठेकेदार त्यास पूर्णपणे जबाबदार राहील.

१०. प्रवासादरम्यान अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

११. वाहनावर पाठविण्यात आलेला वाहनचालक आज्ञाधारक व चांगल्या वर्तणुकीचा, प्रामाणिक व स्वच्छ गणवेशात असावा.

१२. शासननिर्णयाप्रमाणे विहीत दरानुसार जी.एस.टी. मंजूर करण्यात येईल.

१३. ठेकेदाराने टोल, पार्किग व इतर राज्यांचे कर यांची प्रतिपूर्ती प्रत्यक्षात आकारल्यानुसार देयकाव्दारे रा.सु.प.तं.संस्थेस सादर करावी. रा. सु. प. तं. संस्थेकडुन अदा करण्यात येईल. वाहन पुरविताना आवश्यक तेवढे इंधन / टोल / पार्किग यासाठी लागणारी रक्कम संबंधित वाहन चालकाकडे असल्याची खात्री करुनच वाहन पुरविण्यात यावे.

१४.वाहनाची वेळ व किलोमीटर याची गणना रा.सु.प.तं.संस्थेकडुन संस्थेच्या कार्यालयापासून परत रा.सु.प.तं.संस्थेच्या कार्यालयापर्यंत करण्यात येईल. तसेच वाहनाची नोंद संस्थेच्या गेटवर सुरक्षारक्षक यांकडे करणे बंधनकारक राहील (वाहनाचा प्रकार, वेळ, तारीख, प्रवाशांची संख्या,सुरवातीचे रडींग,अखेरचे रिडींग, वाहनचालक माहिती इत्यादी .)

१५.वाहन रा.सु.प.तं.संस्थेमध्ये येण्यापुर्वी वाहन तयारीसाठी कोणताही जादा कालावधी (१/२ तास,१ तास ) अनुज्ञेय असणार नाही. प्रत्यक्षात वाहन रा.सु.प.तं.संस्थेमध्ये आल्याची वेळ व प्रवासानंतर वाहन परत रा.सु.प.तं.संस्थेमध्ये आल्याची वेळच परिगणनेसाठी ग्राहय धरण्यात येईल.

१६. वाहनाचा एक पूर्ण दिवस रात्री १२.०० वाजता संपेल, परंतू रात्री १२.०० ते पहाटे ३.०० या वेळेत वाहनाचा प्रवास संपल्यास त्यास दुसरा दिवस लागू होणार नाही. रात्री १२.०० ते ३.०० या कालावधीच्या प्रवासाचे भाडे परिशिंष्ट अ मधील नमूद केल्याप्रामणे प्रतितासाने अदा करण्यात येईल. पहाटे ३.०० नंतर दुसरा दिवस सूरु होईल. हीच पध्दत पुढील प्रत्येक दिवसासाठी असेल. वाहनात काही तांत्रिक दोष निर्माण झाल्यास तेवढा कालावधी एकूण कालावधीतून वजा केला जाईल.

१७.निविदे सोबत जोडलेल्या **परिशिष्ट 'अ'** मध्ये नमूद केलेली वाहने उपलब्ध करुन देण्याबाबतचा तपशील देण्यात आलेला आहे.

१८. वाहन पुरवठादाराच्या सेवेत व्यत्यय आल्यास रा.सु.प.तं.संस्थेमार्फत इतर वाहन पुरवठादारांकडून मिळेल त्या दराने तत्सम सेवा उपलब्ध करुन घेण्यात येईल व त्यापोटी होणा-या अतिरिक्त खर्चाच्या वसुलीस वाहनपुरवठादार पात्र राहील.

१९. वाहनांची देयके ठेकेदाराने साठवून एकाच वेळी देण्यापेक्षा वेळोवेळी सादर करावीत, डयूटी स्लीप/देयके अर्धवट किंवा खाडाखोड असणे त्याच बरोबर डयुटी स्लीपवर वाहन वापरणा-या अधिका-याची स्वाक्षरी, नाव व अचूक कि. मी. नमूद नसलेल्या देयकांची रक्कम अदा करण्यात येणार नाही. तसेच डयुटी स्लीपवर वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनामासह तसेच रा.सु.प.तं.संस्थेमध्ये वाहन दाखल झाल्याची दिनांकासह वेळ व सुरूवातीचे कि.मी. तसेच प्रवासाहून वाहन परतल्यानंतर रा.सु.प.तं.संस्थेमध्ये दाखल झाल्याची दिनांकासह वेळ व शेवटचे कि.मी. व इतर नोंदी घेऊन संबंधित वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याची डयुटी स्लीपवर नावासह स्वाक्षरी घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची असेल.

२०. वाहनाची वर्दी दिल्यानंतर वर्दीच्या वेळेपूर्वी दोन तास अगोदर वर्दी रद्द करण्याची सूचना केल्यानंतर सदर वाहनाची वर्दी रद्द समजण्यात यावी आणि ज्या प्रकारच्या वाहनाची मागणी केली आहे त्याच प्रकारचे वाहन पुरविणे बंधनकारक राहील.

२१. ठेकेदाराने वाहनाचे देयके सादर केल्यानंतर १५ दिवसांनी अदा करण्यात येईल.

२२. या व्यतिरिक्त ठेकेदारांच्या कोणत्याही अटी व शर्ती मंजूर करण्यात येणार नाहीत.

वरील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

प्राधिकृत व्यक्तीची सही,कंपनीचा / संस्थेचा शिक्का

**संचालक**

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्ज्ञान संस्था

**परिशिष्ट अ**

**एजन्सीचे नाव :** **दिनांक:**

| अ.क्र. | वाहणाचा प्रकार | स्थानिक दर प्रति ४० कि.मी. पर्यंत (४.५) तास दर रु. | स्थानिक दर प्रति ८० कि.मी.पर्यंत (९.० तास) दर रुपये | स्थानिक दर प्रति ८० कि.मी.पेक्षा जास्त प्रति कि.मी. दर रुपये | बाहेरील प्रवास ३०० कि.मी. पर्यंत दर रुपये | बाहेरील प्रवास प्रवास ३०० कि.मी. पेक्षा जास्त प्रति कि.मी. दर रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Celerio/i10/AC | | | | | |
| २ | Celerio / i 10 /nonAC | | | | | |
| ३ | Swift Dezire/ i20/AC | | | | | |
| ४ | Swift Dezire/i 20/non AC | | | | | |
| ५ | Innova AC | | | | | |
| ६ | Innova Non AC | | | | | |
| ७ | Ertica- AC | | | | | |
| ८ | Ertica- NonAC | | | | | |
| ९ | 17- Seater AC | | | | | |
| १० | 17 -Seater Non AC | | | | | |
| ११ | 20- Seater AC | | | | | |
| १२ | 20- Seater Non AC | | | | | |
| १३ | 32- Seater AC | | | | | |
| १४ | 32- Seater non AC | | | | | |
| १५ | 36- Seater AC | | | | | |
| १६ | 36- Seater non AC | | | | | |
| १७ | 40 -Seater AC | | | | | |
| १८ | 40- Seater NON AC | | | | | |
| १९ | 46- Seater AC | | | | | |
| २० | 46- Seater NON AC | | | | | |
| २१ | Volovo Bus AC | | | | | |